Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**Match -2020**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | सतीश तराळांची ग्रामीण कथा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ. अलका गायकवाड–लुंगे | 1 |
| 2 | मत्तेची बँकींग क्षेत्रातील उपयुक्तता | डॉ. सौ. सपना आर. वेगीनवार | 5 |
| 3 | बालसंगोपनात पालकांसमोरी आव्हाने | प्रा. सुषमा जयकुमार फरसोले | 8 |
| 4 | आधुनिकव कौटिलीय कूटनीती आणि जातकीय खत्तिविज्जावादाचे विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 11 |
| 5 | काले धन के स्त्रोत प्रभाव एवंनियंत्रण करने के लिए सुझाव–एक अध्ययन | प्रा. डॉ. ए.बी.पटले | 18 |
| 6 | पंचायतराज मधील महिला नेतृत्व व वास्तव | प्रा. गौतम कांबळे | 23 |
| 7 | आदिवासी समाजातील कुमारी मातांची वर्तमान स्थिती. | प्रा. डॉ. श्रीराम खाडे | 26 |
| 8 | अर्थव्यवस्थेच्या विकासात सरकारची भूमिका | डॉ. प्रदीप दरवरे | 31 |
| 9 | महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार | प्रा. डॉ. सुभाष के. पवार | 35 |
| 10 | महात्मा गांधी का दृष्टिकोण एवं प्रबन्धकीय कौशल | डॉ. मधुलता व्यास | 39 |
| 11 | महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातुन वंचितांचा इतिहास –एक मिमांसा | फकिरा भगवान राजगुरू | 43 |
| 12 | महिला व बालक हक्क अधिकार कायदा व सुव्यवस्था टिकात्मक परीक्षण | प्रा. डॉ. निना सा. चवरे | 50 |
| 13 | कामायनी महाकाव्य की प्रासंगिकता | विक्रम बालकृष्ण वारंग | 55 |
| 14 | किसान क्रेडिट कार्ड योजना : एक अध्ययन | प्रा.डॉ.शालिनी के.पांडे | 60 |
| 15 | महात्मा जोतीराव फुले व समकालीन समाजसुधारक पंडिता रमाबाई | प्रा. डॉ. सुनिल चवळे | 64 |
| 16 | मुद्रा योजनेची कामगिरी | महाजन संजय बाबुराव | 67 |
| 17 | वित्तीय बाजारपेठा आणि वित्तीय संस्था यामधील समन्वय | प्रा.डॉ. संजय उ. उल्हे | 80 |
| 18 | Digital Profiling As A Threat To Democracy | Dr. Jyoti D. Thakare | 82 |

ISSN : 2278-9308
March 2020


| | | |
|---|---|---|
| 19 | Impact of Nature on Occupation Structure of Tribal Population in Chikhaldara Tahsil of Amravati District (Maharashtra State)<br>**Dr. Aruna P. Patil** | 85 |
| 20 | Gender Justice In Modern India **Dr. Suprabha P. Yadgirwar** | 92 |
| 21 | Assessment of Temporal Change in Crop Cultivation of Southern AhmednagarDistrict : A Case Study of Shrigonda Tahsil<br>**Dhawale Ganesh, Devne Manojkumar, Mundhe Nitin** | 97 |
| 22 | Plot constructions of the novel ''heart of darkness<br>**Dr. Laxman Gajanan Kolte** | 103 |
| 23 | An Analytical Study of GST **S. P. Rathod** | 106 |
| 24 | Implementation of New Syllabus of Compulsory English for B. A. III in Gondwana University, Gadchiroli<br>**Shrikant Niranjan Puri / Dr. Dayanand R. Mane** | 111 |
| 25 | Mental Health Status of Married Working Woman in India<br>**Rekha Shriramji Nimbhorkar, Yawalikar** | 115 |
| 26 | A study of Impact of Demonetization on the growth of Mutual Fund industry Sector in India **Dr. B.M.Chachane** | 118 |
| 27 | Exploration of Personality Traits in Kamala Das's Poetic Works<br>**Dr. G.O. Jondhalekar** | 126 |
| 28 | Role of Indian Banks in Maintaining Ecological Balance<br>**Dr. Sanjay Uddhavrao Deshmukh** | 130 |
| 29 | Documentation on Some Ethnic Plant Species of Darwha Region Dist. Yavatmal (M.S.) India **Chavhan V. N.** | 134 |
| 30 | Sasanvansa: The History Of Spreading Buddhism<br>**Dr. Manohar Kumbhare** | 139 |
| 31 | Attitude Of Parents Towards Martial Arts<br>**Mr. Omprakash S. Wasnik / Dr. Mrityunjay Singh** | 143 |
| 32 | Bait-matrices preference tests for crazy ant (Paratrechinalongicornis ) (Hymenoptera: Formicidae) **D.S. Kulkarni** | 145 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**


| | | |
|---|---|---|
| 33 | व्यंकटेश माडगूळकरांच्या तरल कथादृष्टीचा आविष्कार : 'उंबरठा' प्रा.छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 151 |
| 34 | संगीत सम्राट तानसेन रचित धृपदे : एक विश्लेषण **डॉ. प्रज्ञा मेश्राम** | 153 |
| 35 | महाविद्यालयीन मुलींच्या जोडीदार व भावी आयुष्याविषयीच्या परिकल्पना डॉ.शामली जा. दिघडे | 158 |
| 36 | संत तुकारामांचे धार्मिक विचार सहा. प्रा. दीपक वानखडे | 164 |
| 37 | 'एक होता कार्व्हर' या चरित्रग्रंथामधील कार्व्हर यांच्या संघर्षमय शिक्षणाविषयक प्रवासाची समीक्षात्मक चिकित्सा डॉ. पंकज वानखडे | 167 |
| 38 | **पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यात लक्ष्मीबाई पाटील यांचा सहभाग प्रा.झरेकर रमेश सोनू** | 174 |
| 39 | महिला बचत गट नेतृत्व निर्मितीची कार्यशाळा डॉ. सारिका प्र.पाटिल | 177 |
| 40 | श्री. चक्रधर स्वामी यांच्या विचाराचे विश्लेषण **डॉ. प्रशांत सुखदेवराव चऱ्हाटे** | 180 |
| 42 | बाबुराव बागुल :विश्र्वबंधुत्वाच कवी डॉ. प्रफुल्ल गवई | 185 |

ISSN : 2278-9308
March 2020

# बाबुराव बागुल :विश्वबंधुत्वाच कवी

डॉ. प्रफुल्ल गवई
एस.पी.एम.टी.एम. कला व वाणिज्य महाविद्यायल,चिखली

बाबुराव बागूल यांची कथा, कादंबरी, वैचारिक, समीक्षा यामुळे मराठी वाङ मय समृद्ध झाले आहे. 'मूड' सारखीकादंबरी, 'जेव्हा मी जात चोरली', 'मरण स्वस्त होत आहे' हे कथासंग्रह, बागूलांची भाषणे, मुलाखती, 'दलित साहित: आजचे क्रांतीविज्ञान' हा ग्रंथ म्हणजे दलित साहित्याचा महत्त्वपूर्ण दस्तावेज होय. त्यांचा 'वेदाआधी तू होतास' हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. बाबुराव बागूल यांची 'वेदाआधी तू होतास' ही कविता माणसाला उद्देशून असून कवितेचे मोल निश्चित करताना ते म्हणतात, "इतिहास पाहिला तर आर्य आक्रमकांच्या आधी भारतामध्ये चांगली विकसित अशी मोहेंजोदडो संस्कृती होती. हे मोहेंजोदडोची वर्णने वाचून वाटले. आर्य आक्रमकांनी भारतात आल्यावर त्यांच्या सोयीची वाटेल, अशी धर्म आणि संस्कृती विकसित केली ती वैदिक संस्कृती होय. तिलाच आज हिंदू संस्कृती म्हणतात. या हिंदू संस्कृतीमध्ये पुरुषसुक्तामध्ये चार वर्ण कल्पिलेले आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. शूद्र म्हणजे इथले मूळ निवासी. इथले कष्टकरी, इथल्या श्रमातून संपत्ती, सुख निर्माण करणारे जनविभाग. या श्रमातून संपत्ती, सुख निर्माण करणाऱ्याला-जनविभागाला म्हणजे भारतातल्या मूळ निवासीला शूद्र असे म्हटले गेले. शूद्र म्हणजे शारीरिकदृष्ट्या कनिष्ठ नव्हे, बौद्धिकदृष्ट्या कनिष्ट नव्हे, मानसिकदृष्ट्या कनिष्ठ नव्हे, तर फक्त युद्ध हरलेला म्हणून तो शूद्र. युद्ध जिंकलेले आर्य हे रानमाणसं होती. त्यांना दगड विटांची घरे बांधण्याची अक्कल नव्हती. तसेच गावे आणि शहरे वसविण्याची अक्कल नव्हती. तसेच शेती फुलविण्याचीही अक्कल नव्हती, पाण्याचा वापर करण्याचीही अक्कल नव्हती. ती फक्त रानमाणसे होती. त्यांचे अनुकरणीय जीवन म्हणजे पशू प्राण्यांचे जीवन. वाघ, सिंह, हत्ती आणि बैल हे कधी भाऊ भाऊ होत नाहीत. म्हणून तेच अरण्य आदर्श मानवी समाजजीवनात आणले आणि त्यातून मनुस्मृती निर्माण झाली. पुरूषसुक्त निर्माण झाले आणि विषमतेचा, भेदभावाचा पुरस्कार करणारे नीतिशास्त्र, कार्यशास्त्र, कायदेशास्त्र जन्माला आले.

जैनधर्म, बौद्धधर्म हे वैदिक धर्माच्या जवळपासचे भारतातील समकालीन धर्म. जैन धर्माने, बौद्ध धर्माने मनुस्मृतीचा स्वीकार केलेला नाही. पुरुषसुक्ताचा स्वीकार केलेला नाही आणि विषमतेचा अन् भेदभावाचा स्वीकार केलेला नाही. असे का घडावे? वैदिक धर्माला विषमतेची इतकी का आवश्यकता वाटावी? भारतातील जैन आणि बौद्ध धर्माने समतेचा आणि बंधुभावाचा खुलेआम स्वीकार केलेला आहे. तसेच ख्रिश्चन अन् मुस्लीम धर्माने समतेचा आणि बंधुभावाचा खुलेआम स्वीकार केलेला आहे. भारतातील दोन धर्म जैन आणि बौद्ध अन् जगातील दोन धर्म ख्रिश्चन अन् मुस्लीम धर्म हे खुलेआम समतेचा अन् बंधुभावाचा स्वीकार करतात. फक्त वैदिक धर्म वेदामध्ये पुरुषसुक्त मान्य करतो आणि विषमतेचा अन् चार वर्णाचा पुरस्कार करतो. म्हणून वेद हे माणसाने निर्माण केलेले नाहीत. स्वयंभू, अपौरुषेय निर्माण झालेले आहेत, असा प्रचार करतो. या विषमतेचा पुरस्कार करण्यासाठी वैदिक धर्माने अनेक भानगडी निर्माण करून ठेवलेल्या आहेत. त्याचे एक उदाहरण म्हणजे गतजन्मावर पापपुण्याचा स्वीकार.

मी फुले-आंबेडकरी विचारांचा असल्यामुळे, डार्विन, हेगेल आणि मार्क्स यांची विचारसरणी मला मान्य असल्यामुळे, मी माणसाच्या महत्तेचा जोरदार पुरस्कार करतो;"6 म्हणून कवी माणसाला उद्देशून म्हणतो,

'हे माणसा,
वेदाआधी तू होतास
वेदांच्या परमेश्वराआधी तू होतास
हे माणसा,
तूच सूर्याला सूर्य म्हटलेस

आणि सूर्य, सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटलेस
आणि चंद्र, चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस'

(वेदा आधी तू होतास, पृ.क्र. ९)

माणसाला महत्व प्राप्त व्हावे ही अपेक्षा बागूलांना आहे पण जातीव्यवस्थेमुळे प्रचंड सजनाचे सामर्थ्य असलेल्या माणसाला अपमानीत व्हावे लागत आहे. म्हणून ते म्हणतात,

'माणसाएवढे महान काही नाही.
माणसाएवढे सामर्थ्यवान पृथ्वीवर दुसरे नाही
माणसाचे हात वणव्याला भारी होऊ शकतात
प्रलयाचे पायी दोरी बांधू शकतात.
हे वनात वावरणाऱ्या वैदिकांनी
द्रविडांची कामगिरी पाहून ओळखले होते.
म्हणून त्यांनी माणसाला मोडून ठेवण्यासाठी
जातीभेद केले
तुम्ही जातीभेद मानणार काय?
माणसाचा अपमान करणार काय?'

(माणूस, पृ.क्र. १९)

जातीव्यवस्था मानणे म्हणजे माणसाचा अपमान करण्यासारखे आहे. त्याचे सामर्थ्य नाकारण्यासारखे आहे. त्याचे सृजन, अस्तित्व, त्यांच्या जगण्याच्या दिशा आहे म्हणून कवी येथे म्हणतात की, 'माणसा दुसरे नाही' माणसाच्या व की, 'माणसाएवढे महान काही नाही' आणि 'माणसाएवढे सामर्थ्यवान पृथ्वीवर दुसरे नाही' माणसाच्या कष्टावर बागूलांची अपार निष्ठा आहे. त्यांना माणसाचे 'हात' जणू 'प्रज्ञावंत अन् प्रलयकारी' वाटतात. एवढेच नाही तर 'पंचमहाभूतांपरी शक्तिशाली कष्टाळू हात असल्याचे कवीला वाटते, ते म्हणतात

'हे माणसा,
तुझे कष्टाळू हात / घातक अन् अघातक अपार
करील काळाचा प्रहार / तुझे कष्टाळू हात
हे माणसा / तुझे कष्टाळू हात
संपत्तीचे सागर / समृद्धीचे
आगर प्रगतीचे पंख आहेत'

(प्रज्ञावंत प्रलयकारी हात, पृ.क्र. २०)

बागूल वरील कवितेत म्हणतात की, हे माणसा तुझे कष्टाळू 'हात' 'घातक' आणि 'अघातक अपार' आहेत. ते काळावर 'प्रहार' करणारे आहेत. 'संपत्तीचा सागर' आणि 'समृद्धीचे आगर' आहे. 'प्रगतीचे पंख' आहेत माणसाच्या अज्ञात अशा सामर्थ्यांवर बागूल यांचा विश्वास आहे. कष्टाळू हाताला, कष्टकरी वर्गालाच जणू बागूल विकासाच्या प्रगतीचे पंख म्हणतात.

शेवटच्या घटकापर्यंत डॉ. आंबेडकरांचा विचार पोहचण्यासाठी 'कार्यकत्याने' आपले आयुष्य कुर्बान केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अग्नी सतत प्रज्वलीत ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांने खस्ता सहन केल्या आहेत. आंबेडकरी चळवळीचा रथ पुढे नेण्यासाठी या कार्यकर्त्याने आपला बहुमूल्य वेळ खर्ची घातला आहे. याच प्रामाणिक कार्यकर्त्याविषयी

बागूल यांनी आपल्या कवितेत निष्ठा मांडलेली दिसते. कवी कार्यकर्त्याच्या जीवनाची एक मोडकळीस आलेली बाजू कवी आपल्यापुढे मांडतो. कार्यकर्त्यांच्या मनात उद्या काय करायचे
ह हा विचार करत तो एकटाच चाललेला असतो. अशा विचारात थकलेला असला तरी तो समाधाना दिसतो. शरीर कणकणत असले तरी अंतःकरणाच्या आभाळात कल्पनांच्या विजांचा चमचमाट असतो. त्याला काळोख्या पाऊलवाटेने काळोख दूर सारून घरी जायचे असते. त्याचे निर्भय हात बाबुराव बागूल यांना हत्यारासारखे निर्भय वाटतात. प्रकाशमान वाटतात. त्यांच्या शब्दात मने पेटवण्याची ताकद असते. काळोखात असलेल्या कैदी माणसांनाही तो प्रकाशमान करतो. घराविषयीची एक हळवी बाजूही त्यांच्या अंतःकरणात असते.

'चालता चालता जर
झाली घरची, बायकापोरांची आठवण,
खुलतो, फुलतो
घरचे स्मरण, होते स्फुरण,
रणात विजयी होण्याचे!'

(कार्यकर्ता, पृ. क्र. २१)

घराच्या स्मरणाने रणात विजयी होण्याचे स्फुरण कार्यकर्त्याला येते. या ठिकाणी कार्यकर्त्याच्या मनातील विजयी भावनेचे दर्शन कवी घडवतो. ह्याच 'कार्यकर्त्याला' कवी बाबुराव बागूल 'मशाल' हातात घेण्याचे सांगतात. ते म्हणतात,

'ती तेवढी मशाल घे
उजेड देत त्या गरिबांच्या वस्त्यांकडे जा!
जसा येशू गेला होता तसाच जा
आणि तथागत बोलत होता तसाच बोलत रहा'

पुढे प्रचंड ताकदीनीशी आवाहन करायला सांगतात,

'तू नाहीस रथसारथी
म्हणून क्रांती या भारती येत नाही
आता क्रांतीचे आणि जीवनाचे
आणि देशाचे पुढारपण तू स्वीकार
येऊ दे क्रांती या दुःखी देशात
दुःख फार झाले आहे
ते दूर होऊ दे!
येऊ दे क्रांती या दुःखी देशात!'

(मशाल, पृ.क्र. २२)

दुःखी देशात 'क्रांती' येऊ देण्याचे आवाहन बागूल करतात. तू 'रथसारथी' हो, 'देशाचे पुढारपण न स्वीकार' अशी जबाबदारी घेण्याचे सांगतात. नव्या भारत निर्मितीसाठी याची आवश्यकता प्रतिपादन करून त्यांचा पूर्वीचा इतिहासही ते समजून सांगतात. त्या इतिहासातील महापुरुषाच्या प्रेरणा घेऊन इतिहास पुन्हा घडवण्याचे आवाहनच बागूल 'मशाल' या कवितेच्या निमित्ताने करतात. 'वेदाआधी तू होतास' या कवितासंग्रहामध्ये 'बुद्ध, फुले, आंबेडकर' या प्रेरणास्थानाच्या कविता आहेत. 'महाकवी ज्योतिराव फुले', 'ज्योती फुले म्हणतात', 'बुद्धानंतर', 'प्रवचने', 'सिद्धार्थ गौतमा बुद्धा', 'बुद्ध, फुले, आंबेडकर: भारत भाग्य विधाते', 'डॉ. आंबेडकर' इत्यादी कवितांमधून त्यांनी आपल्या प्रेरणेशी संवाद साधला आहे.

'बुद्ध, फुले, आंबेडकर' हे भारताचे भाग्य विधाते आहे ही बागूल यांची धारणा आहे म्हणून ते म्हणतात की,

'टाकावा बदलून भारत'

करावा बौद्धमय आंबेडकर भारत
मनामनातला काळोख करून गोळा
द्यावा फेकून दूरवर
नभाच्या पल्ल्याकडे काळोखात काळोख
अन् करावा पुन्हा प्रकाशमान भारत' .

(सिद्धार्थ गौतमा बुद्धा, पृ.क्र. ५४)

असे बुद्ध-फुले-आंबेडकराचे तत्त्वज्ञान हे प्रकाशाचे तत्त्वज्ञान असल्याची त्यांची भूमिका आहे. भारताला प्रकाशमान करायचे असेल तर 'बौद्धमय आंबेडकर भारत' निर्माण केल्याशिवाय पर्याय नसल्याचे कविला वाटते. 'बुद्ध, फुले, आंबेडकर : भारत भाग्यविधाते' याही कवितेत असाच आशय कवी व्यक्त करतो.

'बौद्ध, प्रकाशमय भारत केला निर्माण
प्रथम भगवान बुद्धाने, दुसऱ्यांदा भीमाने
आता आधुनिक भारताचा इतिहास
होईल बौद्धमय भारताचा इतिहास
अन् प्रलयकारी प्रतिकाराचा इतिहास
पराभवांचा नाही
ती रोगराई केलीय खलास'

(बुद्ध, फुले, आंबेडकरः भारत भाग्यविधाते पृ.क्र. ५६)

किंवा

'बुद्धाचे विचार मनोमनी माहीत झाले
म्हणून लहान लहान मानलेले
महान महान होतांना दिसू लागले
काळोखात कोंडलेले प्रकाश होवून
एकामागे एक पुढे येऊ लागले
देशच प्रबुद्ध होऊ लागला
बुद्धमय होऊ लागला.'

(प्रवचने, पृ.क्र. ५२)

बुद्धमय भारताचे स्वप्न बागूलांच्या कवितेच्या आशयस्थानी आहे. बुद्धमय भारत म्हणजे समतेचे मंगल गाणे होय, अशी मांडणी बाबुराव बागूलांच्या संपूर्ण कवितेतून व्यक्त झाली आहे.

'सूड' या कादंबरीमध्ये जो स्त्रीविषयक विचार व्यक्त झाला आहे त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेमधूनही स्त्रीच्या बलस्थानाविषयीचा प्रचंड विश्वास व्यक्त झाला आहे. आतापर्यंत स्त्रियांना नरकाचे द्वार म्हणून दुय्यमत्त्व बहाल केले आहे हे आधोरेखित करतांना बागूल म्हणतात की,

'तुझ्या दाराजवळच नरकाचे दार असते
तुझ्यात रमले तर स्वर्गाचे दार
कायमचे बंद होते'

लोकमानसात येथील धर्मव्यवस्थेने स्त्रियांविषयी दुषित धारणा रूढ केली परंतु कवी तिला 'माणुस' म्हणून स्वीकारत असल्याने तो तिच्या ठिकाणी सामर्थ्य पाहतो. तिच्या योग्यतेचा गौरव करतांना म्हणतो,

'तू प्रिया होतेस, पत्नी होतेस,
आई होतेस, गृहिणी होतेस,
मुलांची दाई होतेस

ही तुझी सुखदायी रुपे पाहून
निसर्गाने तुझेच अनुकरण केले
तू माझी, माझ्या मुलांचीच नाही
तर निसर्गाचीही शिक्षिका झालीस
हे मला ठावे आहे
धन्यवाद! प्रिये तुला!'

(स्त्री, पृ.क्र. ४३)

निसर्गाचीही शिक्षिका झालीस या शब्दात कवी बागूल तिच्या सामर्थ्याचा उचित गौरव करतात. तिला एक व्यक्तिमत्त्व म्हणून मोल प्राप्त करून देतात.

'व्यवस्थेत बदल घडविलाच पाहिजे' ह्या दृढ निश्चयांची बागूलांची कविता आहे. म्हणून ते म्हणतात,

'ज्याने केली चूक इथे जन्म घेण्याची
त्यानेच ती सुधारली पाहिजे
अशोकापरी भीषण युद्धे करून!
आंबेडकरांपरी प्रचंड प्रखर प्रचार करून
अथवा धर्मत्याग करून!
मोझेसप्रमाणे देशत्याग करून!'

(ज्याने केली चक इथे जन्म घेण्याची!, प.क्र. ३८)

असा दृढनिश्चय बागूलांच्या कवितेच्या आशयामध्ये एखाद्या स्फोटकासारखा भरून आहे. अशा 'नव्या माणसाची शोध घेणारी' कविता आहे. त्यांना अभिप्रेत असलेला नवा माणूस बनी 'नवा मानव हा' या कवितेतून आविष्कारला आहे. ते म्हणतात,

'नवा मानव हा! नवा मानव हा! नवीन याची काया
नवेच याचे मन नवे नयन!
क्षितिजाच्या आत, आहे नजर रोवून
निर्दय निसर्गाशी बलवंत कर झुंजवून
आणि दुजा कर अमृतात बुडवून
भागीरथ प्रयत्नाने मरण मारून
उभारीत आहे श्रमाने नवा सुंदर स्वर्ग
प्रेषीत न होता श्रमिक राहून'

आपल्या श्रमाने नवा स्वर्ग निर्माण करणारा 'श्रमिक' बागूल यांना अपेक्षित असलेला 'नवा मानव' आहे.

'नभाच्या सातलाख पड्यांतील स्वर्ग
दावील मी घामातून निर्मून!'

(नवा मानव हा, पृ.क्र. ७५)

स्वर्गच घामातून निर्माण करणारा मानव त्यांना अभिप्रेत आहे. प्रचंड पोलादी संघटन करून संपूर्ण बलानिशी गर्जना करणारा मानव अपेक्षित आहे. विश्व बंधुत्वाची कास पकडणारा मानव अपेक्षित आहे. बागूल शेवटी म्हणतात की,

'जनतेच्या सुखाकरता
विश्वबंधुत्वाकरता
अपार उत्साहाने हासत गाणे गात
नवनिर्मिती करत असलेल्या मानवाकडे
रवी आश्चर्याने चकीत होऊन, पाहतो सारखा

ISSN :
2278-9308
March
2020

क्षितीजाच्या राज्यावर उभे राहुन
पण हाकावर हाका, चंद्र तारका मारतात आतुन
कारण चंद्र तारकांच्या मनात
उत्सुकता येते उकळून
मग नाईलाजाने सूर्य जातो
दार उघडून आणि नंतर
तीव्र जिज्ञासेने तर्र होवून
चंद्रतारकांचा मेळा येतो
खडाखडा दारे उघडून
हसतात सारखे प्रसन्न होऊन
नव्या मानवाचा विजय देखून!'

(नवा मानव हा, पृ.क्र. ७९)

विश्वबंधुत्वाचे नाते सांगणारा नवा माणूस आहे. या नव्या माणसाचे स्वागतासाठी तारेही उपस्थित आहे.

'विजय याचा अन् हा
विश्वाचा नियंता नवा मानव हा!'

(नवा मानव हा, पृ.क्र. ७९)

असा नव्या जगाचा नवा माणूस बागूल यांना अपेक्षित असून त्यांच्या ठिकाणी असलेले प्रचंड सामर्थ्य कवीने आशावादी दृष्टितून व्यक्त केले आहे.

थोडक्यात बागूल दलित साहित्याला क्रांतीचे साहित्य मानणारा, माणसाला महत्त्व प्राप्त करून देणारा कवी आहे. माणसांबद्दल बागूल प्रचंड आशावादी आहे. 'माणसावर' निष्ठा व्यक्त करणारा कवी आहे. माणसासाठी 'वेदा आधी तू होतास' असा गौरव उद्गार बागूल आपल्या कवितेत मांडतात. त्यांनी वेद, दैव, दैवत्त्व ह्या माणसाला गुलाम करणाऱ्या संकल्पना नाकारल्या असून माणसासाठी गौरवाचे मंगल गाणे त्यांनी कवितेच्या निमित्ताने गायले आहे. बागूल माणसावर प्रेम करणारे असून भ्रामक कल्पनेचा निषेध करणारे आहेत. बुद्ध-फुले-आंबेडकरी विचार हे बागूल यांचे प्रेरणास्थान आहे. विश्वबंधूत्वाचे मूल्य त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे. माणूस धर्मव्यवस्थेतून अर्थव्यवस्थेतून स्वतंत्र झाला पाहिजे अशी धारणा बागूलांच्या कवितेत आहे.

संदर्भ : टीपा

1) बाबुराव बागूल : वेदाआधी तु होतास, दिशा प्रकाशन, नाशिक, 2004 पृ.क्र. 4 व 5

निवडक संदर्भ ग्रंथ

1) बाळकृष्ण कवठेकर : दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापुर प्र.आ. 1981

2) अक्षयकुमार काळे : अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, म.पा.बनहट्टी प्रकाशन, नागपूर प्र.आ. 1999

3) यशवंत मनोहर : समाज आणि साहित्य समीक्षा, सुगाव प्रकाशन, पुणे 1992

4) योगेंद्र मेश्राम : दलित साहित्य उद्गम आणि विकास, मंगेश प्रकाशन नागपूर प्र.आ. 1998